विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय
निमशासकीय सेवेत आरक्षण

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग.
शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र. ६८/९४/१६-ब.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २ जानेवारी, १९९५.

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी क्र. १०९४/ प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४.

शासन निर्णय :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/ प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ अन्वये शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या विशेष मागास प्रवर्गातील जातींना शासकीय निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेमध्ये सरळसेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण ठेवण्यात आले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ मधील आदेशाच्या अंमलबजावणीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास तात्काळ आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ शांता शास्त्री ],
प्रधान सचिव [सेवा],
महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,